उर्दू, हिंदी, कन्नड माध्यमाच्या माध्यमिक
शाळांना परवानगी देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्र. नमाशा २००९/(४९६/०९)/माशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २७ ऑगस्ट २००९.

**शासन निर्णय:-**

शासन परिपत्रक, दि. २९ एप्रिल २००८ अन्वये राज्यात कायम विनाअनुदान तत्वावर राज्यात प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्याकरिता खाजगी शैक्षणिक संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्याअनुषंगाने प्राप्त प्रस्तावांवर जिल्हा व राज्य समितीच्या शिफारशी शासनास प्राप्त झालेल्या आहेत. इंग्रजी व मराठी माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या , (उर्दू ,हिंदी, कन्नड, तेलुगू व इतर ) ज्या प्रस्तावांवर दोन्ही समितीच्या शिफारशी आहेत अशा शाळांना सन २००९-१० पासून या शाळांमध्ये सुरु असलेल्या सर्व वर्गांना विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत आहे. सदर शाळांची यादी शासन निर्णयासोबत जोडलेली आहे.

२. शासन परिपत्रकानुसार माध्यमिक शाळा कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्याकरिता प्रस्ताव मागविण्यात आलेले असले तरीदेखील दि. १६ जून २००९ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयानुसार इंग्रजी माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या शाळांच्याबाबतीतील कायम विनाअनुदानाचे धोरण रद्द करण्यात आलेले असल्याने उपरोक्त परवानगी देण्यात आलेल्या शाळांना विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत आहे. तसेच यासंदर्भात स्पष्ट करण्यात येते की, सुधारित मूल्यांकन निकषानुसार व अनुदानसुत्रानुसारच या शाळांना भविष्यात अनुदान अनुज्ञेय राहील.

३. सदरहू शासन निर्णयासोबत जोडलेल्या प्रपत्रात नमूद शाळा वगळता उर्वरित एका समितीची शिफारस असलेले व दोन्ही समितीची शिफारस नसलेले प्रस्ताव शासन स्तरावरुन नामंजूर करण्यात येत आहेत.

४. शासन निर्णय दि. १९ ऑक्टोबर २००७ मधील तरतुदीनुसार सदर शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आलेल्या शाळा अठरा महिन्यांच्याआत सुरु करणे बंधनकारक राहील, अन्यथा या शाळांचे परवानगी आदेश रद्द झाले आहेत असे गृहित धरले जाईल.

५. विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या सहपत्रात नमूद सर्व शाळांना शासनाच्या सर्व संबंधित नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

६. विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या सहपत्रात नमूद सर्व शाळांना माध्यमिक शाळा संहितेतील तरतुदीनुसार प्रथम मान्यतेकरिता संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे अर्ज करणे आवश्यक राहील. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २००९०८२७१५४२५९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( डॉ. सुवर्णा सि. खरात )
अवर सचिव , महाराष्ट्र शासन

प्रत- शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक./सर्व शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद/ शिक्षण निरीक्षक(उत्तर/दक्षिण/पश्चिम), मुंबई
मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.सचिव (शा.शि.) यांचे स्वीय सहायक.
शालेय शिक्षण विभागातील कार्यासन अधिकारी- माशि-३/उमाशि-२/मध्यसंचया. निवड नस्ती, माशि-१

E:\REKHA\G R\locad-1-mnasha 496-1(09).lwp

मुख्याध्यापक
अलमनार हायस्कुल
शिवली, ता. हवेली, जि. पुणे

मुख्याध्यापक
अलमनार हायस्कुल
शिवली, ता. हवेली, जि. पुणे

जिल्हाः पुणे.

| प्रस्ताव क्रमांक | संस्थेचे नाव | शाळेचे नांव व ठिकाण | माध्यम |
|---|---|---|---|
| २ | अलमनार एज्यु. सोसा. गट नं.७६९ आझादनगर, पवारवस्ती कुदळवाडी चिखली पुणे | अलमानार हायसकूल, चिखली ता.हवेली | उर्दु |
| ३ | मदरसा इमदादूल उलूम यसुफिया गोपाळवाडी रोड ता.दौंड | मदरसा इमदादुल उलुम यसुफिया गोपाळवाडी रोड ता.दौंड | उर्दू |

मुख्याध्यापक
अलमनार हायस्कुल
चिखली, ता. हवेली, जि. पुणे

मुख्याध्यापक
अलमनार हायस्कुल
चिखली, ता. हवेली, जि. पुणे